॥ या विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572
Phone: (02462) 215246

**NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT**

website: srtmun.ac.in
E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र.: रासेयो/२०२५–२६/२६०

दिनांक : १३/१२/२०२५

**परिपत्रक**

प्रति,
मा.प्राचार्य/रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो. संलग्नीत सर्व महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय: "राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिन" आणि "राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन सप्ताह" म्हणून साजरा करणे बाबत.**

**संदर्भ:** मा. व्यवस्थापक (ऊर्जा संवर्धन) येरवडा, पुणे यांचे जा.क्र.ईसीएन/२०१२–१३/सीआर–२५ दिनांक १९/११/२०१२ रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयी मा. व्यवस्थापक (ऊर्जा संवर्धन) येरवडा, पुणे यांनी संदर्भिय पत्रान्वये आजच्या युगात आपण **"ऊर्जे शिवाय माणूस"** हा विचारसूध्दा करु शकत नाही. सामन्यत: अन्न, वस्त्र व निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा म्हणून ओळखल्या जातात, परंतु आजच्या या विकासाच्या युगात **"ऊर्जा"** चाही मूलभत गरजांत समावेश करावा लागेल. तसेच **"ग्लोबल वार्मिंग"** सारख्या गंभीर समस्यांचा जगास सामोरे जावे लागत आहे. ऊर्जा समस्येस सामोरे जाण्यासाठी ऊर्जेचा काटकसरीने व कार्यक्षमतेने वापर होणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी ऊर्जा संवर्धनाविषयी सर्व घटकांमध्ये जनजागृती होणे अत्यंत गरजेचे असल्याचे कळविले आहे. तसेच दरवर्षी दिनांक १४ डिसेंबर हा **"राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिन"** तर १४ ते २० डिसेंबर हा **"राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन सप्ताह"** म्हणून साजरा करण्यात येतो असे कळविले आहे.

तरी त्यानुषंगाने रा.से.यो. संलग्नित सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात ऊर्जा संवर्धनाचे उद्दिष्ट साध्य होण्यासाठी सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट क्र. १ मध्ये निर्देशित केल्यानुसार दिनांक १४ डिसेंबर हा दिवस **"राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिन"** म्हणून व दिनांक **१४ ते २० डिसेंबर हा दिवस "राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन सप्ताह"** म्हणून साजरा करण्यात साजरा करण्यात यावा व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या <u>**nss@srtmun.ac.in**</u> या ई–मेल वर पाठविण्यात यावा, ही विनंती.

प्रा. डॉ. मारोती गायकवाड
**संचालक**
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

**<u>प्रत माहितीस्तव:</u>**

१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. प्र.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. कुलसचिव कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
४) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

**<u>प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:</u>**

१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.

Scanned with OKEN Scanner

(3)

# परिशिष्ठ क्र. १

| अ क | कार्यक्रम |
|---|---|
| १. | विविध प्रसिध्दी माध्यमातून जनजागृतीस्तव जाहिराती देणे |
| २. | शालेय स्तरावर उर्जा संवर्धन विषयांतर्गत निबंध व चित्रकला स्पर्धा आयोजित करणे. |
| ३. | उर्जा संवर्धन कायद्यांतर्गत उद्योगक्षेत्रातील पथनिर्देशीत ग्राहकांकडून सदर आठवडा साजरा करावयास सांगणे व त्याविषयीचा अहवाल मागविणे |
| ४. | शासनाचे सर्व शासकीय व निमशासकीय विभाग, सर्व जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकारी, महानगरपालिका आयुक्त, मुख्य अधिकारी, विभागीय आयुक्त कार्यालये, सर्व जिल्हा पोलिस अधिक्षक, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सर्व कार्यालये यांना याविषयी कळवून सदर आठवडा साजरा करावयास सांगणे. तसेच त्यांच्या माहितीस्तव व त्यांना मदत होण्याच्या दृष्टीने सदर आठवड्यात कोणकोणते उपक्रम राबवावयाचे याविषयीची मार्गदर्शनपर संक्षिप्त माहिती व जाहिरात फलक पुरविणे व आठवडा साजरा केल्याबद्दलचा अहवाल मागविणे. |
| ५. | उद्योग क्षेत्रातील १००० किलोवॅट विद्युतभार जोडणी असणाऱ्या संस्थांना ऊर्जा संवर्धन आठवडा साजरा करावयास सांगणे व त्याबाबतचा अहवाल मागविणे |
| ६. | ऊर्जा कार्यक्षम उपकरणांच्या उत्पादकांना ऊर्जा संवर्धन आठवडा साजरा करणेस सांगणे व त्याबाबतचा अहवाल मागविणे |
| ७. | उद्योग क्षेत्रातील विविध संघटनांना ऊर्जा संवर्धन आठवड्यादरम्यान जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करणेसाठी विनंती पत्र पाठवून त्याबाबतचा अहवाल मागविणे |
| ८. | सदर आठवड्यादरम्यान विविध क्षेत्रांसाठी जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करणे. |
| ९. | ऊर्जा संवर्धनाविषयीचे बॅनर्स व पोस्टर्स तसेच ऊर्जा संवर्धनाची प्रतिज्ञा (मराठी व इंग्रजी) www.mahaurja.com या संकेत स्थळांवर आपल्या माहितीसाठी उपलब्ध करून दिली आहेत. |

Scanned with OKEN Scanner